**शपथेवर पुढील सरतपास श्री.देशपांडे अधिवक्ता गैरअर्जदारातर्फे :—**

४. शपथपत्र **नि.क्र. सि.—६** मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

**उलटतपास श्री.वानखेडे विधिज्ञ अर्जदारातर्फे:—**

५. अर्जदार हा दि.१६/१०/१९८९ रोजी चालक म्हणुन रूजु झाला. त्यांना तात्पुरत्या समय श्रेणीवर दि.२७/१०/१९९० रोजी तात्पुरत्या समय श्रेणीवर घेण्यात आले. दि. २६/१०/१९९५ रोजी अर्जदाराला कायम वेतन. श्रेणी लागु करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, नियुक्ती दिनांकापासुन रोजंदारी काळात अर्जदाराने सलग काम केलेले आहे. दि.३१/१२/२०२२ रोजी अर्जदार सेवानिवृत्त झाले. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराचा सेवाकालावधी हा ३३ वर्षाचा आहे. अर्जदाराला उपदानाची रक्कम रू. ४,४५,२००/— ही दि.२८/०२/२०२५ रोजी त्याला देण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराचा सेवाकालावधी हा २१ वर्षाचा गृहीत धरून त्याला उपदानाची रक्कम दिली आहे.

६. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराला सेवेतुन बडतर्फ करण्यात आले होते परंतु कामगार न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अर्जदाराला सेवा. सलगतेसह पुन्हा नौकरीवर घेण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की,बडतर्फ कालावधीतील उपदानाची रक्कम अर्जदाराला दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हा बडतर्फ कालावधीतील उपदानाची रक्कम मिळण्यास पात्र आहे. हे मला माहिती नाही की, अर्जदार दि.३१/१२/२०२२ रोजी सेवा. निवृत्त झाल्यांनंतर त्याला एका महिन्याच्या आत उपदानाची रक्कम देणे आवश्यक आहे. हे मला माहिती नाही की, अर्जदाराला रक्कम रूपये,४,४५,२००/— या रक्कमेवर व्याज देण्यात आले होते किंवा

नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराला रक्कम रू. ४४५२००/— या रक्कमेवर व्याज दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, महाव्यवस्थापक यांनी fn-22@2024 या परीपत्रकाप्रमाणे प्रत्येक एस.टि.कर्मचा—याला दि. ०१/०४/२०२० पासुन रक्कम रू.६५००/— वेतनवाढ देण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाढीव वेतनाप्रमाणे कर्मचा—यांचे हिशोब करून ठेवणे आवश्यक होते. हे म्हणणे खरे आहे की, नविन वेतनवाढीप्रमाणे कर्मचारी यांना पैसे देण्यात यावे असे आदेश महाव्यवस्थापक यांनी आदेश काढले आहे.

७. हे म्हणणे खरे आहे की, नविन वेतनवाढी प्रमाणे रक्कम रू. ६५००/— ॲड करून अर्जदाराला उपदानाची रक्कम देणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार सेवानिवृत्त झाला त्यावेळी ३४ टक्के महागाई भत्ता होता. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला रक्कम रू. ४२०२३१/— एस.महामंडळाकडून उपदानाच्या फरकाच्या रक्कम व्याजासह देणे लागतात. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले असुन आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास काही नाही.

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

स्व/—
(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर.

दि. ०९.१२.२०२५.